# प्रेस नोट

मुंबई वाहतूक पोलिसांकडून रात्रीच्या वेळी वाहनांवर वापरण्यात येणाऱ्या तीव्र व डोळे दिपवुन टाकणाऱ्या प्रकाशामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी ‘‘डॅझलिंग लाईट’’ (Dazzling Light) विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

अवैध अतिरिक्त फ्लॅश लाईट्स, एलईडी बार तसेच फॅन्सी व तीव्र प्रकाश देणाऱ्या हेडलाईट्सच्या वापरामुळे समोरून येणाऱ्या वाहनचालकांच्या डोळ्यांवर विपरीत परिणाम होऊन काही क्षणांसाठी दृष्टी बाधित होऊ शकते. त्यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. हे अपघात टाळणे आणि नागरिकांचा प्रवास सुरक्षित करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे आदेशान्वये ४१ वाहतुक विभागांमध्ये दिनांक ०६/०८/२०२६ ते ०९/०८/२०२६ या कालावधीत u/sec MMVR 235/177 MVA अन्वये एकूण १,१९४ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून, संबंधित वाहनचालकांवर एकुण ७,५०,०००/- रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

मुंबई वाहतूक पोलिसांकडून ही मोहीम यापुढेही सुरू राहणार आहे. त्यामुळे सर्व वाहनचालकांना आवाहन करण्यात येते की, रात्रीच्या वेळी वाहन चालविताना लो-बीमचा वापर करावा, अनधिकृत फ्लॅश लाईट्स, एलईडी बार किंवा तीव्र प्रकाश देणारे फॅन्सी दिवे वापरू नयेत आणि वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

रस्ता सुरक्षा ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. जबाबदार नागरिकांनी स्वत:चा तसेच इतर नागरिकांचा प्रवास सुरक्षित ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे.

मुंबई वाहतूक पोलीस
वाहतूक मुख्यालय, वरळी मुंबई.



